www.rajdand.com
सातारा, शनिवार
11.02.2023
पृष्ठ : ४ | मूल्य : ₹ ४.०० | माघ कृ.६
/rajdandlive
Reg.No. MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
मुख्य संपादक : राही भिडे


आग्रा किल्ल्यावर शिवजयंती होणार : महाराष्ट्र सरकार सहआयोजक होण्यास तयार

पान ४ वर..



# 'ऐतिहासिक' अर्थसंकल्प ठरला गोंधळाचे कारण

**जयपूर : वृत्तसंस्था**

**राजस्थानच्या विधिमंडळात अशोक गहलोत सरकारचा या कार्यकाळातील अखेरचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. मात्र, हा अर्थसंकल्प खऱ्या अर्थाने 'ऐतिहासिक' ठरला आणि त्याने विरोधी पक्षांच्या हातात आयते कोलीत दिले.**



गेहलोत त्यांनी विधिमंडळात अर्थसंकल्प सादर करायला सुरुवात केली. सुरुवातीचे काही मुद्दे वाचून होतात ना होतात तोच संपूर्ण सभागृह सुन्न झाले. मुख्यमंत्र्यांच्या सहायकाने त्यांच्या आसनाजवळ येऊन कानात काहीतरी सांगितले. गेहलोत वाचत होते ते मुद्दे मागील वर्षीच्या अर्थसंकल्पातील होते.

या प्रकाराने काही क्षण सुन्न झालेल्या विरोधकांनी सभागृहात गोंधळ घालण्यास सुरुवात केली. त्यांनी हा सभागृहाचा आणि लोकशाहीचा अपमान असल्याचा आरोप करीत सभापतींसमोर घोषणाबाजी सुरू केली.

ही मानवी चूक आहे. ती कोणाकडूनही होऊ शकते, असे सांगत सभापती डॉ. सी पी जोशी यांनी विरोधकांना शांत करण्याचा प्रयत्न केला. घडला प्रकार सभागृहाच्या नोंदीतून वगळण्याचे आदेश दिले. मात्र, विरोधकांनी त्याला दाद न दिल्याने गोंधळ वाढत गेला आणि कामकाज अर्धा तास स्थगित करण्यात आले.

पुन्हा कामकाज सुरू होताच मुख्यमंत्री गेहलोत यांनी या प्रकाराबद्दल खंत व्यक्त केली. आपल्याकडे नवीन अर्थसंकल्पाची प्रत आहे. मात्र, जुन्या अर्थसंकल्पाची काही पाने त्याला जोडून आल्याचे स्पष्टीकरण दिले. मात्र, विरोधकांनी मुख्यमंत्र्यांनी माफी मागावी अशी मागणी करत पुन्हा घोषणाबाजी सुरू केली. आज अर्थसंकल्प सादर न करता राज्यपालांकडून नवा दिवस ठरवून त्या दिवशी अर्थसंकल्प मांडावा, अशी त्यांची मागणी होती.


## राष्ट्रवादी काँग्रेस लवकरच फिरवणार भाकरी

### पक्षसंघटनेत बदल करून नव्या चेहऱ्यांना देणार संधी

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रदेश कार्यकारिणीपासून स्थानिक पातळीपर्यंत संघटनात्मक पातळीवर बदल करून नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाणार आहे. आगामी काळात होणाऱ्या महापालिका आणि अन्य स्थानिक निवडणुका लक्षात घेऊन हे बदल महत्त्वाचे ठरणार आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि त्यांच्या कार्यकारिणीचा कार्यकाळ यापूर्वीच संपुष्टात आला आहे. कोरोना महासाथीमुळे पक्षांतर्गत निवडणुका घेणे शक्य नसल्याने जयंत पाटील आणि राज्याच्या कार्यकारिणीला मुदतवाढ मिळाली आहे. मात्र, पुढील काळात येणाऱ्या निवडणुका लक्षात घेऊन पक्षातील विविध संघटना आणि आघाड्या यांच्यावर नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाणार आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये एकूण पाच संघटना आणि ३० पेक्षा अधिक आघाड्या आहेत. या सर्व संघटना आणि आघड्यांमध्ये पदांची पुनर्रचना करून विशेषत: युवा वर्गाला अधिक जबाबदाऱ्या दिल्या जाणार आहेत, अशी माहिती पक्षाच्या वरिष्ठ सूत्रांनी दिली.

## विरोधी नेत्यांच्या वादाचा भाजपला फायदा

### रोहित पवारांनी टोचले ज्येष्ठांचे कान

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाची ताकद फार उल्लेखनीय असल्याचे दिसून येत नाही. मात्र विरोधी पक्षातील नेत्यांमध्ये असलेल्या वाद विवादांचा फायदा घेऊन भाजप पुढे जात असल्याचे ऐकवून राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी ज्येष्ठ नेत्यांचे कान टोचले आहेत.

सध्या महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि माजी प्रदेशाध्यक्ष आणि मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यातील वादाची जोरदार चर्चा आहे. या वादाच्या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.



ज्येष्ठ नेत्यांच्या कडे पाहूनच आम्ही राजकारण शिकत असतो. त्यांच्याबद्दल आमच्या मनामध्ये आदराची भावना असते. तरुण आमदारांनी नेते कार्यकर्त्यांसाठी ते आदर्श होत आहेत याची जाणीव ठेवून त्यांनी आपल्यातील वादाचा फायदा उठवण्यापासून भाजपला रोखले पाहिजे, असे पवार यांनी नमूद केले.

## देशाच्या पंतप्रधानांचे लक्ष मुंबईच्या महापालिकेवर

### आम्हीही सज्ज असल्याचा संजय राऊत यांचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान आहेत मात्र त्यांचे लक्ष मुंबई महापालिकेवर आहे. महापालिका निवडणुका होईपर्यंत मोदी कदाचित राजभवन मध्येच राहतील किंवा मुंबईत घरही घेतील, अशी उपरोधिक टीका शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी केली आहे.

वंदे भारत एक्सप्रेस सह अन्य काही विकास कामांच्या कार्यक्रमांसाठी पंतप्रधान मुंबईच्या दौऱ्यावर आहेत. नजीकच्या काळातला पंतप्रधानांचा हा सलग दुसरा दौरा आहे. हे दौरे मुंबई महापालिका निवडणूक नजरेसमोर ठेवूनच आयोजित केल्याची टीका राऊत यांनी केली आहे.



मुंबई महापालिका निवडणूक जिंकण्यासाठी मुंबई आणि राज्यातील भारतीय जनता पक्षाचे नेते आणि मिंधे गट असमर्थ असल्याची जाणीव झाल्यामुळेच पंतप्रधानांना या निवडणुकीत लक्ष घालावे लागत असेल, अशी कोपरखैरही राऊत यांनी मारली. अर्थात इतर राज्यांप्रमाणे देशभरातील नेतेमंडळी प्रचाराला आणून उभी केली तरीही तुम्ही महापालिका जिंकू शकत नाही. आम्ही इथे सज्ज आहोत, असा इशाराही राऊत यांनी दिला.

## निवडणूक प्रचाराचा धुरळा शाळेपर्यंत पोहोचला

### भाजपा आणि काँग्रेस उमेदवारांचे एकमेकांवर आरोप

**पुणे : प्रतिनिधी**

कसबा पेठ विधानसभा मतदारसंघातील भाजपा उमेदवार हेमंत रासने आणि काँग्रेस उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी एकमेकांवर शाळेत पालकांना गाठून प्रचाराची पातळी खालावल्याचे आरोप केले आहेत.

रासने यांनी प्रचाराच्या पदयात्रेदरम्यान शनिवार पेठेतील थेट एका शाळेतच प्रवेश केला. त्यावेळी सकाळची शाळा सुटल्याने मुलांना घेण्यासाठी पालक शाळेच्या आवारात आले होते. रासने आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी पालकांना शाळेच्या आवारातच गाठून आपल्याला मत देण्याचे आवाहन केले. तसेच प्रचार पत्रकांचे वाटपही करण्यात आले. या प्रकाराने संतापलेल्या पालकांनी उमेदवार, कार्यकर्त्यांकडे तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. याची कुणकुण महाविकास आघाडीच्या गोटात लागल्यावर त्यांनी भाजपा उमेदवाराला बोल लावण्यास सुरुवात केली. त्याला प्रत्युत्तर म्हणून धंगेकर यांनीही रमणबाग प्रशालेच्या आवारात प्रचार केल्याचा आरोप झाला. या प्रकाराची चित्रफीतही समाजमाध्यमांवर फिरत आहे. शाळेतील प्रचाराबाबत प्रतिस्पर्धी उमेदवार एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करण्यात मग्न आहेत. पालक आणि सामान्य मतदारांमध्ये मात्र या प्रकाराबाबत संताप आहे.

## ...तर खुर्चीवर बसलेले कमजोर होते का?

### राऊत यांच्या आरोपावर पटोले यांचा पलटवार

**मुंबई : प्रतिनिधी**

मी राजीनामा दिला नसता तर महाविकास आघाडी सरकार पडले नसते, हे सांगून शिवसेना प्रवक्ते संजय राऊत यांनी माझ्या शक्तीची जाणीव देशाला करून दिली आहे. मात्र, त्यावेळी खुर्चीवर बसलेल्यांचा पक्ष आणि नेतृत्व सरकार टिकविण्यास कमजोर होते का, असा कडवट सवाल करून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष. नाना पटोले यांनी राऊत यांच्यावर पलटवार केला आहे.

शिंदे गटाने बंड केल्यावर पटोले यांनी विधानसभा अध्यक्षपदाचा राजीनामा दिला नसता तर अपात्र आमदार ठरविणे सोपे झाले असते आणि सरकार पडले नसते, अशी टीका राऊत यांनी केली असून त्याला राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही नेत्यांनी दुजोरा दिला आहे. या आरोप वजा टीकेला पटोले यांनी सडेतोड उत्तर देत शिवसेना नेतृत्वाकडेच बोटं रोखले आहे.



मला विधानसभा अध्यक्षपद देणे हा निर्णय तत्कालीन पक्षाध्यक्ष सोनिया गांधी यांचा होता आणि मी पक्षाध्यक्ष पदाचा राजीनामा देणे हा निर्णयही त्यांचाच होता. सहयोगी पक्षाच्या नेतृत्वाने घेतलेल्या निर्णयाबद्दल टीकाटिप्पणी करणे अयोग्य आहे, असेही पटोले यांनी राऊत यांना सुनावले.

त्यावेळी मी राजीनामा दिल्यामुळे खोक्याचे सरकार आले, असे राऊत यांचे म्हणणे आहे. विधानसभा अध्यक्ष म्हणून माझ्याकडे संवैधानिक शक्ती होती. राऊत यांनी माझ्या शक्तीचे संपूर्ण देशाला प्रदर्शन घडविले आहे. मात्र, त्यावेळी सरकार वाचविण्यासाठी सत्तेच्या खुर्चीवर बसलेल्या लोकांकडे उपाय नव्हते का? त्यांचा पक्ष आणि नेतृत्व त्यासाठी कमजोर पडले का, अशा प्रश्नांची सरबत्ती पटोले यांनी केली आहे.

## संभाजी ब्रिगेडची निवडणूक रिंगणातून माघार

### महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा करणार प्रचार

**पुणे : प्रतिनिधी**

कसबा आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघात होणाऱ्या पोटनिवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय संभाजी ब्रिगेडने घेतला असून दोन्ही मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा प्रचार करू, असे पुरुषोत्तम खेडेकर यांनी सांगितले आहे.

संभाजी ब्रिगेडने कसबा आणि चिंचवड या दोन्ही मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले होते. संभाजी ब्रिगेडची शिवसेनेबरोबर युती आहे तर शिवसेना हा महाविकास आघाडीतील सर्वात मोठा पक्ष आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेने महाविकास आघाडीच्या उमेदवाराची पाठराखण करायची की संभाजी ब्रिगेडच्या उमेदवाराचा प्रचार करायचा, असा पेच निर्माण झाला होता.

या निवडणुकीतील बंडोबांना थंड करण्यासाठी उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते सचिन आहेर यांनी आज संबंधितांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी झालेल्या चर्चेत शिवसेनेच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन संभाजी ब्रिगेडने निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती अहिर यांनी दिली. संभाजी ब्रिगेड महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## हिंडेनबर्गविरोधात अदानी समूह आक्रमक; कारवाईसाठी अमेरिकन कायदे तज्ज्ञांची घेणार मदत


**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशातील उद्योजक गौतम अदानी यांची अदानी समूह आणि अमेरिकन रिसर्च फर्म हिंडेनबर्गमधील संघर्ष आता आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. अदानी समूहाने हिंडेनबर्गविरुद्ध कायदेशीर लढाई तीव्र केली आहे. यासाठी अदानी समूहाने अमेरिकेतील सर्वात मोठ्या लॉ फर्मची नियुक्ती केली आहे. या अमेरिकन फर्मचे नाव वॉचटेल आहे.

**१०० अब्ज डॉलरचे नुकसान**

हिंडेनबर्ग रिसर्च फर्मने अदानी समूहावरील आपला संशोधन अहवाल प्रकाशित केल्यानंतर एकच खळबळ उडाली होती. अदानी समूहातील कंपन्यांच्या शेअर दरात मोठी घसरण दिसून आली. अदानी समूहाच्या मार्केट कॅपमध्ये जवळपास १०० अब्ज डॉलरची घट झाल्याचे दिसून आले. त्यानंतर आता अदानी समूहाने हिंडेनबर्गला कायदेशीर झटका देण्याची तयारी सुरू केली आहे.

'बिझनेस टुडे'ने दिलेल्या वृत्तानुसार, हिंडेनबर्गविरोधातील कायदेशीर कारवाईसाठी अदानी समूहाने न्यूयॉर्कच्या वॉचटेल, लिफ्टन, रोसेन, काट्ज सारख्या दिग्गज कायदेशीर सल्लागार कंपनी आणि लॉ फर्मसोबत संपर्क साधला आहे. हिंडेनबर्गनेच्या रिपोर्टनंतर अदानी समूहाला मोठा झटका बसला आहे.



वॉचटेलने अदानी समूहासोबत काम करणाऱ्या सिरिल अमरचंद मंगलदास या लॉ फर्मच्या कार्यालयाशी संपर्क साधल्याचे वृत्त आहे. सिरिल अमरचंद मंगलदास ही लॉ फर्मचे नेतृत्व सिरिल श्रॉफ करत आहेत. त्यांच्या मुलीचे लग्न गौतम अदानी यांच्या मुलाशी झाले आहे. वॉचटेल ही कंपनी अदानी समूहाच्या सल्लागाराच्या भूमिकेत आहे. अदानी समूहाला विविध कायदेशीर सल्ले देते.

**हिंडेनबर्गने केले होते आरोप**

हिंडेनबर्गने २४ जानेवारी २०२३ रोजी अदानी समूहातील कंपन्यांबाबत आपला संशोधन अहवाल जाहीर केला होता. यामध्ये अदानी समूहातील कंपन्यांनी शेअर दर वाढवण्यासाठी गैरव्यवहार केला असल्याचा ठपका ठेवला होता. अदानी समूहावर आर्थिक अनियमितेचा आरोप हिंडेनबर्गने केला होता.

**सुप्रीम कोर्टाने सेबीला दिले महत्त्वाचे निर्देश**

हिंडेनबर्ग-अदानी प्रकरणात आज सुप्रीम कोर्टात महत्त्वाची सुनावणी पार पडली. सुप्रीम कोर्टाने भारतीय गुंतवणूकदारांना झालेल्या कोट्यवधींच्या आर्थिक नुकसानीची सुप्रीम कोर्टाने दखल घेत चिंता व्यक्त केली. भविष्यात अशा स्थितीत गुंतवणूकदारांच्या हितासाठी व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी सेबीकडून सूचनादेखील मागितल्या आहेत. त्याशिवाय, सुप्रीम कोर्टाने या प्रकरणी एक तज्ज्ञ समिति नेमण्याबाबतही संकेत दिले. या प्रकरणी आता पुढील सुनावणी १३ फेब्रुवारी रोजी पार पडणार आहे.

## धक्कादायक... राष्ट्रवादीचे आमदार सेक्सटॉर्शनच्या जाळ्यात

### १ लाखांच्या खंडणीची केली मागणी; आरोपीला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**पुणे : प्रतिनिधी**

आतापर्यंत सर्वसामान्य नागरिकांना अश्लील व्हिडीओ पाठवून सायबर आरोपींनी लाखो रुपयांना गंडविल्याच्या बातम्या आपण ऐकत होतो. पण आता थेट आमदारसाहेबांनाच अश्लील व्हिडीओ कॉल करुन तसेच सेक्सटॉर्शनच्या जाळ्यात अडकवून त्यांच्याकडून लाखभर रुपये उकळण्याचा प्लॅन करणाऱ्या आरोपीला पुणे पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. मोहोळचे राष्ट्रवादीचे आमदार यशवंत माने यांना सेक्सटॉर्शनच्या जाळ्यात ओढण्याचा आरोपीचा प्लॅन होता. पण माने यांच्या सतर्कतेने आरोपीचा प्लॅन फसला.



ऑनलाइन फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ होत असताना आता सायबर चोरट्यांनी थेट आमदार साहेबांनाच जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न केला आहे. सोलापूर जिल्ह्यातील मोहोळचे राष्ट्रवादीचे आमदार यशवंत विठ्ठल माने यांना ब्लॅकमेल करून सायबर चोरट्यांनी त्यांच्याकडून १ लाख रुपयांची मागणी केली. आतापर्यंत सर्वसामान्य नागरिकांना सेक्सटॉर्शन प्रकरणात फसविल्याच्या विविध केसेस समोर आल्या होत्या. आज थेट आमदारांनाच जाळ्याच ओढल्याचा प्रकार समोर आल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत राष्ट्रवादीचे आमदार यशवंत माने यांनी पुणे सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. याप्रकरणी रिजवान अस्लम खान (वय २४ रा. राजस्थान मधील भरतपूर) येथून पोलिसांनी आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत.

आमदार यशवंत माने यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोशल मीडियावरुन माझा नंबर घेऊन, मला संबंधित आरोपी अश्लील संदेश पाठवायचा. तसेच तो मला व्हिडिओ कॉल, फेसबुक-व्हाट्सअ‍ॅप वरून सर्वत्र अश्लील मेसेज पाठवून माझी बदनामी करण्याच्या उद्देशाने कृत्य करत राहिला. तसेच नंतर एक लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केली. या संपूर्ण प्रकरणाची मी पोलिसांत तक्रार केली असून पोलीस अधिक चौकशी करत आहेत, अशी माहिती आमदार यशवंत माने यांनी दिली.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव रिजवान अस्लम खान असून त्याच्याकडे प्राथमिक तपास केला असता सदर गुन्ह्यात सक्रिय सहभाग निष्पन्न झाला आहे. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली असून सदर आरोपीकडून एकूण चार मोबाईल, सीम कार्ड जप्त करण्यात आले आहेत. आरोपीकडून जप्त केलेल्या मोबाईलमध्ये स्क्रीन रेकॉर्ड केलेले ९० अश्लील व्हिडिओ आढळून आलेले आहेत. सदर आरोपीस पाच दिवसांची पोलिस कोठडी दिलेली असून सदर केसचा तपास पोलीस निरीक्षक बलभीम ननवरे करीत आहेत.

**बँकेची ४०९ कोटींना फसवणूक**

## आमदार रत्नाकर गुट्टेंसह कुटुंबीयांवर सीबीआयकडून गुन्हा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सीबीआयने परभणीतील गंगाखेड विधानसभा मतदारसंघातून रासपचे आमदार आणि साखर उद्योगपती रत्नाकर गुट्टे आणि गंगाखेड शुगर अँड एनर्जी लिमिटेड यांच्या विरोधात ४०९.२६ कोटी रुपयांच्या कथित बँक फसवणुकीप्रकरणी एफआयआर दाखल केला आहे. याशिवाय गुट्टेंचा मुलगा आणि कुटुंबातील काही सदस्यांवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रत्नाकर गुट्टे यांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत परभणीतील गंगाखेड विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रीय समाज पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढून जिंकली आहे.

सीबीआयच्या माहितीनुसार, रत्नाकर गुट्टे हे गंगाखेड शुगर अँड एनर्जी लिमिटेडच्या संचालकांपैकी एक आहेत. युको बँकेच्या नेतृत्वाखालील बँक संघटनांकडून २००८ आणि २०१५ च्या दरम्यान गंगाखेड शुगर अँड एनर्जी लिमिटेडने मुदत कर्ज, वर्किंग कॅपिटल सुविधा आणि इतर क्रेडिट सुविधांच्या रुपात ५७७.१६ कोटी रुपयांच्या विविध कर्ज सेवा घेतल्याचा आरोप असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

अकलूज येथील श्री विजय गणेशोत्सव मंडळ पब्लिक ट्रस्टच्या वतीने

# सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार जाहीर

**अकलूज : प्रतिनिधी**

अकलूज येथील श्री विजय गणेशोत्सव मंडळ पब्लिक ट्रस्टच्या वतीने सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार जाहीर झाले आहेत.

या पुरस्कारासाठी राज्यातील साहित्यिकांना साहित्यकृती ट्रस्टकडे पाठवण्याचे आवाहन ट्रस्टचे कार्याध्यक्ष आमदार रणजितसिंह मोहिते -पाटील आणि प्रताप क्रिडा मंडळाच्या व साहित्यकृती पुरस्कार समितीच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील यांनी केले होते, त्या आवाहनास महाराष्ट्रातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. यामध्ये कादंबरी, कविता, कथासंग्रह, चरित्र ग्रंथ, ललितलेख, समीक्षा ग्रंथ, आध्यात्मिक ग्रंथ, ऐतिहासिक संदर्भ ग्रंथ असे २५० हून अधिक साहित्यिकांचे साहित्य प्राप्त झाले. त्यामधून साहित्य पुरस्कार समितिने पुरस्काराचे स्वरूप व्यापक करीत खालील साहित्यिकांना पुरस्कार जाहीर केले आहेत.

सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील विशेष साहित्य पुरस्कार अच्युत गोडबोले, यांना जाहीर करण्यात आला. अच्युत गोडबोले हे तंत्रज्ञ, समाजसेवक, मराठीतील लेखक आणि प्रसिद्ध वक्ते आहेत. विज्ञान, संगणक, तंत्रज्ञान आणि व्यवसाय या विषयांवर त्यांनी प्रामुख्याने लेखन केले आहे. अच्युत गोडबोले यांनी अर्थात अनर्थ विकासनीती, सर्वनाशाच्या उंबरठ्यावर, जीनिअस अलेक्झांडर फ्लेमिंग , जीनिअस अल्बर्ट आईनस्टाईन , जीनिअस आयझॅक न्यूटन, जीनिअस एडवर्ड जेन्नर कॅनव्हास , किमयागार, गणिती , जीनिअस गॅलिलिओ गॅलिली, गुलाम स्पार्टाकस ते ओबामा, झपूर्झा - भाग १, २, ३ , जग बदलणारे १२ जीनिअस , थैमान चंगळवादाचे , नॅनोदय (नॅनोटेक्नॉलॉजीविषयक), नादवेध (संगीतविषयक), बखर संगणकाची , बोर्डरूम , मनकल्लोळ भाग १ व २ , मुसाफिर (आत्मकथन), जीनिअस मेरी क्युरी , जीनिअस जे. रॉबर्ट ओपेनहायमर, रक्त, लाईम लाईट, , विदेशी चित्रपटसृष्टीची अनोखी यात्रा, लुई पाश्चर , संगणक युग , संवाद, स्टीव्ह जॉब्ज : एक झपाटलेला तंत्रज्ञ अशी अनेक पुस्तके लिहलेली आहेत या सर्व साहित्याचा विचार करून त्यांना विशेष साहित्यकृती पुरस्कार देणेत येणार आहे.



सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील ललित साहित्यकृती पुरस्कार डॉ.यशवंत पाटणे सातारा जाहीर करण्यात आला. देवदूताच्या कथा -ललित कथा संग्रह २०२०, सहावे सुख ललित लेख संग्रह २०२२, चैतन्याचे चांदणे व्यक्तिचित्रण लेख संग्रह २०२२, चंदनाचे हात ललित लेख संग्रह २०२२ , सुंदर जगण्यासाठी ललित लेख संग्रह २०२२, उद्याच्या आनंदासाठी ललित लेख संग्रह २०२२ या साहित्यसाठी ललित साहित्य कृती यांचा विचार करून त्यांना ललित साहित्यकृती पुरस्कार देणेत येणार आहे.

सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील काव्य साहित्यकृती पुरस्कार डॉ.राजेंद्र दास कुर्डुवाडी यांना जाहीर करण्यात आला. त्यांची पुस्तके 'इमान' (काव्यसंग्रह) 'शब्द भेटण्याच्या वयातच (काव्यसंग्रह) 'कोसळेपर्यंत' (काव्यसंग्रह) सद्गुरु जीवनदर्शन' (चरित्र) घर आलं का ?काळोख पहाटेपूर्वीचा 'उतरलेली उन्हें ( संचार सोलापूर या पुरवणीत) हे ललित लेखनाचे सदर, सोलापुरी विचार' व 'दारागिरी सदरे या साहित्याचा विचार करून त्यांनी लिहिलेल्या तुकोबा या काव्य संग्रहास काव्य साहित्यकृती पुरस्कार देण्यात येणार आहे.

या पत्रकार परिषदेत ट्रस्टचे कार्याध्यक्ष आमदार रणजितसिंह मोहिते -पाटील व पुरस्कार निवड समितीच्या व प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते - पाटील यांनी यासंदर्भात माहिती दिली. यावेळी बोलताना स्वरुपाराणी मोहिते -पाटील यांनी सांगितले की सहकार महर्षी शंकरराव मोहिते -पाटील हे विविधांगी व्यक्तिमत्व होते. त्यांचे अनेक साहित्यिक, विचारवंत, लेखक व वक्ते यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध होते .त्यांच्या कार्याची ही परंपरा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा श्री. विजय गणेशोत्सव मंडळ पब्लिक ट्रस्टचे अध्यक्ष.विजयसिंह मोहिते -पाटील यांनी सुरू ठेवली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १५ फेब्रुवारी २०२३ रोजी सहकार महर्षी शंकरराव मोहिते -पाटील राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार देण्यात येणार आहे. या पुरस्काराचे वितरण जेष्ठ साहित्यिक आणि महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष. सदानंद मोरे यांचे शुभहस्ते आणि. विजयसिंह मोहिते पाटील यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. या कार्यक्रमासाठी. राजसिंह मोहिते- पाटील ,. जयसिंह मोहिते- पाटील ,. मदनसिंह मोहिते- पाटील ,. आमदार राम सातपुते , धैर्यशील मोहिते-पाटील संग्रामसिंह मोहिते- पाटील , सत्यशील मोहिते-पाटील,. अर्जुनसिंह मोहिते- पाटील . शिवतेजसिंह मोहिते- पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत होणार असल्याचे.स्वरुपाराणी मोहिते -पाटील यांनी सांगितले.

**विशेष पुरस्कार स्वरूप रुपये ५००००, सन्मानचिन्ह, ललित आणि काव्य साहित्यकृती पुरस्कार रुपये प्रत्येकी २५ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, शाल असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.**

सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील साहित्य पुरस्कार वितरण समारंभ बुधवार दिनांक १५फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्मृतीभवन शंकरनगर याठिकाणी संपन्न होणार आहे.

या पत्रकार परिषदेस ट्रस्टचे अध्यक्ष माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते -पाटील, उपाध्यक्षा नंदिनीदेवी मोहिते -पाटील, सचिव अभयसिंह माने -देशमुख, संचालक चंद्रकांत कुंभार , श्रीकांत राऊत, संचालिका फातिमा पाटावाला आदी उपस्थित होते.

# जिल्हात तीन लाख बालकांची आरोग्य तपासणी - सीईओ दिलीप स्वामी

■ जागृत पालक सुदृढ बालक अभियानाचा सिध्देवाडीत शुभारंभ

**सोलापूर : प्रतिनिधी**

जिल्हात तीन लाख बालकांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. जागृत पालक सुदृढ बालक अभियान प्रभावी पण राबवा असे आवाहन सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

पॅढरपूर तालुक्यांतील सिध्देवाडी येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबीरात आज जागृत पालक सुदृढ बालक अभियानाचा शुंबारंभ आज सिईओ दिलीप स्वामी यांचे हस्ते करणेत आला. आज अंगणवाडी व प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळेतील मुलांची आरोग्य तपासणी करणेत आली. या कार्यक्रमाच्या आज जि प सदस्य वसंतराव देशमुख, उप मुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, बाल विकास प्रकल्प अधिकारी अमृत सरडे , वैद्यकीय अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, वैद्यकीय अधिकारी शुभांगी गुंजाळ ,सरपंच. रोहिणी सारंग जाधव, विठ्ठलचे संचालक दशरथ जाधव, दिपक भालेकर, प्रगतशाल बागायतदार बालाजी जाधव, सदस्य रमेश बनसोडे, आप्पा जाधव , संतोष जाधव प्रमुख उपस्थित होते.

सोलापूर जिल्हयात अंगणवाडीतील ३ लाख बालके व प्राथमिक शाळेतील किमान चार लाख बालकांची आरोग्य तपासणी करणेत येणार आहे.

या प्रसंगी बोलताना सिईओ स्वामी म्हणाले, जिल्ह्यात जागृत पालक व सुदृढ बालक अभ्यास राबविणेत्त येत आहे. दि, ९ फेब्रुवारी पासून याची जिल्हयात अभियानाची अंमलबजावणी करणेत येणार आहे. श्रम संस्कारामुळे युवकांवर चांगले संस्कार होतात. या शिबीरामुळे युवकांचा व्यक्तीमत्व विकास होणेस मदत होणार आहे.

या प्रसंगी सिध्देवाडी येथील मातांचा सत्कार आंबेचे रोप देऊन सिईओ स्वामी यांचा सत्कार करणेत आला. सिईओ स्वामी यांचा सत्कार सारंग जाधव यांचे हस्ते करणेत आला.

या प्रसंगी अंगणवाडी सैनिकांनी बेटी बचाओ बेटी पढाओ या वर पथनाट्य सादर केले. या प्रसंगी बेबीकेअर किट चे वाटप सिईओ स्वामी यांचे हस्ते करणेत आले. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी आभार मानले.

# सम्राट प्रतिष्ठानच्या वतीने माता रमाई जयंती साजरी

**अकलूज : प्रतिनिधी**

अकलूज येथे सम्राट प्रतिष्ठानच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून माता रमाई जयंती साजरी करण्यात आली.

तत्पूर्वी माता रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती सचिन शिंदे, मुक्तार कोरबू, रणजित देशमुख, अरुणा ताई कांबळे, संकेत कुलकर्णी, निलेश ननवरे,हरी मोरे, अनिकेत धाईंजे,सम्राट प्रतिष्ठानचे अध्यक्ष शशिकांत भोसले, अंगणवाडी सेविका गायकवाड उपस्थित होते.



सम्राट प्रतिष्ठानचे अध्यक्ष शशिकांत भोसले हे नेहमी सम्राट प्रतिष्ठानच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबवित असतात. कोणते ना कोणते औचित्य साधुन शालेय मुलांना शालेय साहित्य वाटप करणे,विविध महापुरूष यांची जयंती साजरी करणे,जयंती निमित्त विविध प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन करणे,रक्तदान शिबिरे आयोजित करणे अशा विविध प्रकारच्या उपक्रमांमुळे सम्राट प्रतिष्ठानचा ठसा माळशिरस तालुक्यात उमटला आहे. विविध प्रकारच्या सामाजिक उपक्रमांमुळे सम्राट प्रतिष्ठानचे कौतुक सर्व स्तरातून होताना दिसत आहे.

## शनिवारी जिल्ह्यात राष्ट्रीय लोकअदालत

**सातारा :** सातारा मुख्यालय आणि जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयात शनिवार दि. ११ फेब्रुवारी २०२३ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सर्व प्रकारचे दिवाणी दावे व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे ठेवण्यात आली आहेत. जिल्ह्यातील न्यायालयात लोकअदालतीचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एम.जे धोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या लोक अदालतीत धनादेश न वाटलेली प्रकरणे, वादपूर्व प्रकरणे, मोटार अपघात दावे, थकीत कर्जाची प्रकरणे, वैवाहिक वाद, थकीत ग्रामपंचायतीची मालमत्ता कर व पाणी बिलाचे प्रकरणे इत्यादी सर्व प्रकारणांचा समावेश आहे.

# आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रयत्नातून अकलूज नगरपरिषदेच्या वैशिष्ठ्यपूर्ण कामांसाठी १० कोटींचा निधी मंजूर

**अकलूज : प्रतिनिधी**

राज्यातील नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी देण्यात येणार्या विशेष अनुदान योजने अंतर्गत आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी केलेल्या विशेष प्रयत्नामुळे अकलूज नगरपरिषद हद्दीतील २७ विकासकामांसाठी तब्बल १० कोटी रूपयांचा निधी मंजुर झाला आहे.

आ.रणजितसिंहमोहिते-पाटील यांनी नव्याने स्थापन झालेल्या अकलूज नगरपरिदेअंतर्गत विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध होण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन २७ कामांसाठी १० कोटींच्या निधीची मागणी केली होती. आ.रणजितसिंहांच्या मागणीची तात्काळ दखल घेऊन मागणी केलेल्या सर्व कामांना मंजुरी देत तब्बल १० कोटी रूपये मंजूर करण्यात आले आहेत. नगर विकास विभागाकडून सदर कामांच्या मंजूरीचे पत्र नुकतेच नगरपरिषदेस प्राप्त झाले आहे.

मंजुर झालेल्या कामांमध्ये जुने मुस्लीम कब्रस्तान ते नवीन कब्रस्तान कर्मवीर चौक सेतू (पूल) बांधण्यासाठी ६५ लाख, जुना सराटी रोड विकासनगर येथे पूल बांधकामासाठी ५० लाख, शांतीनगर २ महेश कुलकर्णी व धनश्री लोंढे ते विजय सुर्यवंशी यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रस्त्यासाठी ३७ लाख, सुजयनगर येथील सुवर्णा जयसिंह यांचे घर ते पी.एस.पाटील यांचे घर व साई सर्जिकल ते अंगणवाडी पर्यंतचा रस्ता कॉंक्रीट करण्यासाठी ४८ लाख, राऊतनगर मधील शब्बीर शेख ते जमदार वकील ते लाकडी अड्डा गटार बांधकाम करणेसाठी ३५ लाख, रिलायन्स ट्रेंडस् ते स्नेहल भास्करे घर व एल.आय. सी. ऑफिस ते हनुमंत रणवरे घर रस्ता डांबरीकरण करणे साठी ८९ लाख, संत गाडगेबाबा चौक ते अस्लम सय्यद यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे साठी २२ लाख, उद्योगमहर्षि कै. उदयसिंह मोहिते-पाटील चौक जय कलेक्शन ते डी.सी.सी. बॅंक गटर बांधकाम करणेसाठी १५ लाख, जुना पंढरपूर रस्ता ते अकलूज वेळापूर सांगोला रस्ता पर्यंत जोडणारा रस्ता डांबरीकरण करणे साठी ९९ लाख, चांगदेव पताळे घर ते सह्याद्री आय. टी.आय (शिवाजीनगर १) रस्ता कॉंक्रीटीकरण करणे साठी १७ लाख, नवनाथ चव्हाण ते असिफ दुरापकर घर कॉंक्रीट रस्ता करणेसाठी २३ लाख, अंगणवाडी क्रं.२ ते माने वर्कशॉप ते नाल्यापर्यंत शिवाजीनगर नं.२ पर्यंत कॉंक्रीट गटर बांधकाम करणेसाठी ४२ लाख, नीता गोडसे ते शिवलिंग दड्डे (साई पार्क) रस्ता डांबरीकरण करणेसाठी १२ लाख, अकलूज सांगोला रस्ता ते डि.पी. सुरेश राऊत ते बंडू नाईकनवरे (दत्तनगर) रस्ता डांबरीकरण व गटर बांधकाम करणेसाठी ४७ लाख, अनपट हॉस्पीटल ते इंदापूर बायपास तालीम रोड रस्ता डांबरीकरण व गटर बांधकाम करणेसाठी ५१ लाख, किसन बनकर ते मीनाक्षी कुदळे रस्ता डांबरीकरण करणे साठी १६ लाख, सदुभाऊ चौक ते प्रतापसिंह चौक पर्यंत कॉंक्रीट गटर बांधकाम करणेसाठी ५० लाख, ताम्हाणेनगर येथे श्री हॉस्पीटल येथील ते व्हेज स्ट्रीट हॉटेलपर्यंत कॉंक्रीट गटर बांधकाम करण्यासाठी ३५ लाख, ताम्हाणेनगर येथील अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे व गटर बांधकाम करण्यासाठी ४० लाख, महावीर स्तंभ ते उदयरत्न टाऊनशिप पर्यंत कॉंक्रीट रस्ता करणे साठी ३० लाख, महावीर स्तंभ ते तलाठी कार्यालय पर्यंत डांबरीकरण करणे व गटर बांधकाम करणेसाठी २० लाख, महादेवनगर पाणी टाकी ते जुना महाळूंग रस्ता पर्यंत कॉंक्रीट रस्ता व गटर करणेसाठी १५ लाख, अकलूज टेंभूर्णी रस्ता ते समतानगर ते नवीन महाळूंग रस्ता पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे साठी ३० लाख, अकलाईनगर(ठवरे प्लॉट) ते डॉ.बळते हॉस्पीटल पर्यंत रस्ता डांबरीकरण करणेसाठी २२ लाख, पाटीदार भवन ते बाह्यवळण मार्ग पर्यंत रस्ता डांबरीकरण करणेसाठी ३० लाख, सावतामाळी मंदिर ते ओढ्यापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे व गटर बांधकाम करण्यासाठी ४० लाख रूपये अशा प्रकारे एकूण १० कोटी रूपये मंजूर झाल्याचे पत्र नगरपरिषदेस प्राप्त झाले आहे.



मंजुर कामांमुळे अकलूज परिसरातील रस्ते व गटारींचे प्रश्न मार्गी लागणार असल्याने नागरीकांकडून समाधान व्यक्त होत असतानाच आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांचे आभार मानण्यात येत आहेत.

# छत्रपती शिवाजी संग्रहालय सुरू करा अन्यथा काळे फासू

## माजी उपनगराध्यक्ष सुहास राजेशिर्के यांचा इशारा

**सातारा : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी संग्रहालय अद्ययावत सुविधांसह थ्रीडी स्वरूपात तातडीने खुले करावे अन्यथा या विलंबाला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांना दिसेल तिथे काळे फासले जाईल, असा खळबळ जनक इशारा सातारा नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष सुहास राजेश शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे. छत्रपती शिवाजी संग्रहालया संदर्भातील भूमिका सुहास राजू शिर्के यांनी पत्रकार परिषदेत मांडली.

ते पुढे म्हणाले, छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाचा वारसा शाहू नगरीला आहे. छत्रपती शिवाजी संग्रहालयामध्ये ऐतिहासिक शस्त्रे आज्ञापत्रे वस्तू दस्तूर खुद्द छत्रपती शिवराय ज्या सिंहासनावर बसत होते तेथील राजवस्त्र तलवारी ढाली ऐतिहासिक हत्यारे हा छत्रपती शिवाजी संग्रहालयाचा अनमोल ठेवा आहे. छत्रपती शिवाजी संग्रहालयाच्या इमारतीसाठी शासनाने कोट्यवधी रुपयांचा खर्च केला आहे. दोन वर्षांपूर्वी कोरोना च्या काळात रुग्णांवर उपचार करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने ही इमारत ताब्यात घेतली होती. या सोयीमुळे हजारो रुग्णांचे प्राण वाचले ही बाब निश्चितच समाधानकारक आहे. मात्र जिल्हा प्रशासनाने ही इमारत पुरातत्त्व विभागाकडे हस्तांतरित केली आहे. तरीसुद्धा इमारतीच्या काही भागांमध्ये करोना हॉस्पिटलसाठी उभारण्यात आलेली शौचालयाची भांडी व रचना हटवण्यात आलेली नाही येथील जैव वैद्यकीय कचरा हटवण्यासाठी खासदार उदयनराजे भोसले यांच्या सूचनेप्रमाणे येसूबाई फाउंडेशनच्या वतीने आम्ही स्वतः व शिवाजी संग्रहालय अभिरक्षक प्रवीण शिंदे यांनी स्वच्छता मोहीम हाती घेतली होती. या कामात जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर सुभाष चव्हाण यांचे मोठे सहकार्य मिळाले.

येत्या १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवरायांची ३९२ वी जयंती आहे या जयंती दिनेश हे शिवाजी संग्रहालय सातारकरांसाठी खुले केल्यास यापेक्षा वेगळा दुग्ध शर्करा योग नाही.

# बाल विवाह होत असल्यास बाल विकास कार्यालयाशी व पोलीस विभागाशी संपर्क साधावा

## महिला व बाल विकास अधिकारी विजय तावरे

**सातारा : प्रतिनिधी**

बाल विवाहाने मुलांच्या शैक्षणिक, सामाजिक, मानसिक व शारिरीक आरोग्यावर दुष्परीणाम होतात. बाल विवाह करणे हा कायद्याने गुन्हा असून असे विवाह होत असल्यास महिला व बाल विकास कार्यालयाशी व पोलीस विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन महिला व बाल विकास अधिकारी विजय तावरे यांनी केले.

येथील ज्ञानदीप विद्यामंदिरात बालविवाह प्रतिबंध जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षीय भाषणात श्री. तावरे बोलत होते. या प्रसंगी बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) दीपक ढेपे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सुजाता देशमुख, चाचा फौंडेशनच्या जिल्हा अध्यक्षा डॉ. हेमलता हिरवे यांच्यासह अंगणवाडी सेविका, महिला उपस्थित होत्या.

अंगणवाडी सेविकांनी बाल विवाहाच्या दुष्परीणामाबाबत समाजामध्ये जनजागृती करावी, असे सांगून श्री. तावरे म्हणाले, अंगणवाडी सेविका राज्य शासनाच्या विविध योजना सक्षमपणे समाजापर्यंत पोहचवित आहेत. कुठे बाल विवाह होत असल्यास १०९८ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव हे गुप्त ठेवले जाते. बाल विवाह झाल्यास यामध्ये ज्यांचा सहभाग आहे अशांवर कायदेशीर करवाई होऊ शकते, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

राष्ट्रीय बाल हक्क आयोगाकडे बाल विवाहाच्या अनेक तक्रारी येत आहेत. समाजामध्ये जनजागृती करण्याचे काम बाल विकास प्रकल्प कार्यालयाकडून करण्यात येत आहे. बाल विवाह करणे म्हणजे मुलांच्या आयुष्य धोक्यात घालणे आहे. ही जाणीव समाजात रुजविण्याचे काम करण्यात येणार असल्याचे श्री. ढेपे यांनी प्रास्ताविकात सांगितले.

# सातारा पालिकेकडून शंभर फ्लेक्स जप्त; आठ जणांना दहा हजार दंडाची नोटीस

**सातारा : प्रतिनिधी**

फुकट फ्लेक्स बाजी करणाऱ्यांना सातारा पालिकेने आज कठोर चाप लावला . अतिक्रमण हटाव विभागाने शहरात धडक कारवाई करत तब्बल शंभर फ्लेक्स जप्त केले . आठ जणांना दंडात्मक कारवाईची नोटीस बजावण्यात आली आहे . ही फ्लेक्स हटाव मोहिम यापुढेही सुरू राहणार असल्याचे अतिक्रमण निरीक्षक प्रशांत निकम यांनी सांगितले .

सातारा पालिकेच्या अतिक्रमण विभागाने गुरुवारी शहरात ठिकठिकाणी लावण्यात आलेले शंभरहून अधिक अनधिकृत फ्लेक्स बोर्ड जप्त केले. तसेच आठ जणांना दंडात्मक कारवाईची नोटीस बजावली असून, प्रशासकीय सभेत झालेल्या ठरावाप्रमाणे संबंधितांकडून प्रत्येक दहा हजार रुपये सेवा शुल्क वसूल केले जाणार आहे.

सातारा शहरातील अनधिकृत फ्लेक्स बोर्डचा विषय नेहमीच चर्चेचा ठरतो. वारंवार कारवाईचा बडगा उगारला अथवा फ्लेक्स बोर्ड जप्त केले तरी पालिकेची परवानगी न घेता सार्वजनिक ठिकाणी फ्लेक्स बोर्ड लावणाऱ्यांची संख्या काही कमी होत नाही. अशा फुकट्या जाहिरातदारांवर अंकुश लावण्यासाठी पालिका प्रशासनाने नुकत्याच झालेल्या प्रशासकीय सभेत फ्लेक्स बोर्ड जप्त करण्याबरोबरच संबंधितांकडून दहा हजार रुपये सेवा शुल्क वसूल करण्याचा ठराव मंजुर केला. दरम्यान, मुख्याधिकारी अभिजित बापट यांनी दिलेल्या सूचनेनुसार अतिक्रमण विभागप्रमुख प्रशांत निकम यांच्या पथकाने गुरुवारी जिल्हा रुग्णालय, वायसी कॉलेज, गोडोली चौक, शाहूनगर, बॉम्बे रेस्टॉरंट चौक या ठिकाणाहून शंभरहून अधिक फ्लेक्स जप्त केले.



फ्लेक्स लावणाऱ्या आठ जणांना अतिक्रमण विभागाने नोटीस बजावली असून, संबंधितांकडून प्रत्येकी दहा हजार रुपये सेवा शुल्क वसूल केले जाणार आहे. शहरात शुक्रवारी देखील अनधिकृत फ्लेक्स जप्त करण्याची मोहीम राबविली जाणार असल्याची माहिती प्रशांत निकम यांनी दिली.



# विद्यार्थ्यांनी कलेतून छंद जोपासावेत - डॉ.धवलसिंह मोहिते पाटील

**अकलूज : प्रतिनिधी**

माळशिरस तालुक्याचे भाग्यविधाते सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या ४४ व्या पुण्यतिथीनिमित्त सोलापूर जिल्हा जनसेवा संघटनेच्या वतीने माळशिरस तालुका बाल चित्रकला स्पर्धचे उदघाटन सोलापूर जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे जिल्हाध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. अकलूज येथील सदुभाऊ सांस्कृतिक भवन येथे या चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या.या बाल चित्रकला स्पर्धेत तालुक्यातील ५५०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.यंदाचे या स्पर्धेचे ४४ वर्ष आहे.



डॉ. धवलसिंह मोहिते पाटील पुढे म्हणाले की,लहान वयात मुलांच्या कलेला चालना देण्याचे काम जनसेवा संघटनेच्या माध्यमातून लोकनेते स्वर्गीय प्रतापसिंह मोहिते यांनी गेली ४३ वर्षापुर्वी सुरू करण्यात आले आहे.या चित्रकला स्पर्धेतून उद्याचे उदयमुख कलाकार निर्माण व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्रारंभी सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील व स्व.प्रतापसिंह मोहिते पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी सदाशिवराव माने विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रतापराव पाटील सर, जनसेवा संघटनेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब इनामदार, जिल्हा सरचिटणीस सुधीर रास्ते, युवक संघटनेचे सरचिटणीस मयूर माने, उपाध्यक्ष राजाभाऊ गुळवे, रणजीतसिंह देशमुख,दिपक सुत्रावे, मोहसिन शेख, श्रीमती साळुंखे मॅडम, सदाशिवराव माने विद्यालय प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती नुरजहाँ शेख, तानाजी काशिद ,दत्ता शिंदे ,धोत्रे आदी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा.लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११/२ आणि १/१३, वारजे पुणे-४११ ०५८ येथे मुद्रित करून अर्थभवन, पोवई नाका, सातारा येथून प्रकाशित केले. या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद सातारा न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील. सीईओ आणि मॅनेजिंग एडिटर राजेश वरळेकर. RNI Regd No. : MAHMAR/17902/1999

# मोटारसायकल चोरी करणाऱ्या सराईत आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद

**सातारा : प्रतिनिधी**

मोटारसायकल चोरून त्या परस्पर विकणाऱ्या दोन आरोपींना तुपेवाडी तालुका खटाव येथे स्थानिक गुन्हे शाखेने सापळा रचून अटक केली. सोमनाथ शिवाजी जाधव राहणार फडतरवाडी तालुका खटाव व सागर संजय शिंदे वय २७ कापील तालुका कराड अशी संबंधित आरोपींची नावे आहेत.

वाढत्या मोटरसायकल चोरींच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी स्थानिक गुन्हे शाखेस सूचना देऊन सतर्क केले होते. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांना गोपनीय बातमीदार मार्फत



मोटरसायकल चोरी प्रकरणातील इसम तुपेवाडी येथे येणार असल्याची माहिती मिळाली होती. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तुपेवाडी येथे सापळा रचून एका इसमाला जिल्हा परिषद शाळेच्या नजीक ताब्यात घेतले मोटरसायकल स्वाराने तत्पूर्वी गाडीवरून पळून जाण्याचा प्रयत्न केला पोलीस हवालदार अमोल माने यांनी त्याच्यावर झडप घालून त्यास पकडले.

संबंधिताकडे चौकशी केली असता संबंधित मोटरसायकल त्याने आपल्या साथीदारांसह यशवंतराव चव्हाण ब्लड बँक सुपर मार्केट कराड येथून चोरल्याचे कबूल केले. एकूण ८७ हजाराचा मुद्देमाल जप्त करून पोलिसांनी संबंधित आरोपींना ताब्यात घेतले आहे या कारवाईमध्ये पोलीस उपनिरीक्षक विश्वास शिंगाडे साहेब ओझर तानाजी माने सुधीर बनकर मोहनाचं साबीर मुल्ला मंगेश महाडिक राजकुमार ननावरे अमोल माने आम्ही झेंडे मुनीर मुल्ला अजित करणे स्वप्निल माने शिवाजी भिसे अमित सपकाळ प्रमोद सावंत अजय जाधव केतन शिंदे स्वप्निल दौंड यांनी सहभाग घेतला होता.

# कोरेगावच्या आठवडा बाजारात फाळकूटदादांची दादागिरी

## विक्रेत्यांना त्रास, नगर पंचायत-पोलिसांचे दुर्लक्ष

**कोरेगाव : प्रतिनिधी**

कोरेगावच्या आठवडा बाजारात दोन-चार फाळकूटदादा बाजारात धिंगाणा घालून बाजारात विक्रीसाठी माल घेऊन आलेल्या विक्रेत्यांना त्रास देऊन सळो की पळो करून सोडले आहे. याबाबत कोरेगाव नगर पंचायत व कोरेगाव पोलीस ठाण्यात तक्रार केल्यानंतरही कोणतीही कारवाई केली नसल्याचे विक्रेते सांगत असल्याने या फाळकुट दादांवर कुणी नियंत्रण घालणार की नाही असा सवाल विक्रेते उपस्थित करत आहेत.

**कोरेगावचा आठवडा बाजार हा मोठा असतो. या बाजाराची मोठी आर्थिक उलाढाल आहे. रोजीरोटी मिळावी म्हणून प्रत्येक व्यवसायिकाची धडपड असते. आमच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह आठवडा बाजारावर आहे. परंतु या दारूड्यांना अक्षरशः आम्ही कंटाळलो आहोत. नगर पंचायत व पोलिसांनी दखल घेऊन या दरुड्याचा बंदोबस्त करावा, अशी आमची मागणी आहे. अन्यथा एखादे दिवशी विक्रेतेच या दारुड्याना चोप देतील. त्यानंतर कायदा हातात घेतला म्हणून आम्हाला दोष देऊ नका.**

**- अर्जुन आवटे, फळविक्रेते, सचिव कोरेगाव तालुका राजवंश आठवडा बाजार संघटना.**

कोरेगाव हे तालुक्याचे मुख्यालय आहे. सोमवार व गुरुवार हे आठवडाबाजारचे दोन दिवस आहेत. कोरेगाव ही जिल्ह्यातील मोठी बाजारपेठ असल्याने दोन्ही वारी मोठे बाजार भारतात. भाजीपाला, फळे, खेळणी, किराणामाल, पावबटर, जिलेबीदुकान, नवीन कपड्यांचे स्टॉल, जुन्या कपडयाचे विक्रेते, हार्डवेअर दुकान आदी साहित्याचे हजारो व्यवसायिक,विक्रेते या ठिकाणी आपला माल विक्रीसाठी घेऊन कोरेगाव तालुक्यासह जिल्ह्यातुन तसेच परजिल्ह्ययातून येतात.याचाच फायदा कोरेगाव शहरातील दोन-चार फळकूटदादा घेत आहेत. विक्रेत्यांकडे दारू पिण्यासाठी दुवसभर पैसे मागतात पैसे न दिल्यास त्यांना दमदाटी, शिवीगाळ करून चक्क विक्रीसाठी आणलेला माल उचलून घेऊन जात असल्याने या फळकूटदादांनी विक्रेत्यांना हैराण करून सोडले आहे.चिरी मिरीसाठी विक्रेत्यांना त्रास देऊन सळो की पळो करून सोडले आहे. या फाळकूट दादांच्या त्रासाला कंटाळून कोरेगावच्या आठवडा बाजारला जावे की नको अशाही विचारात काही विक्रेते आहेत.

सातारा जिल्ह्यात सातारा, कराड,फलटण, कोरेगाव या प्रमुख बाजारपेठा म्हणून ओळखल्या जातात त्यातल्या शांत, संयमी शहर म्हणून कोरेगाव शहराची वेगळी ओळख जिल्ह्यात असल्याने मोठी उलाढाल याच बाजारात होत असल्याने बहुसंख्येने व्यापारी, व्यवसायिक खरेदी-विक्रीसाठी कोरेगावच्या बाजारात येत असतात. गेल्या अनेक महिन्यापासून निष्कारण दोन-चार फळकूटदादा सकाळपासून बाजारात हजेरी लावून दारूसाठी पैसे मागणीसाठी तगादा लावतात. दिवसभर विक्रेत्यांकडे दारूसाठी पैशाची मागणी करतात यावरून विक्रेते व फळकूटदादामध्ये वादविवादही होतात. तुम्ही येथे बाहेरून येता गपचूप पैसे द्या अन्यथा मार देऊ आशा पद्धतीची दमदाटी, धमकी देऊन दारूसाठी विक्रेत्यांकडून पैसे उकळण्याची धडपड या फळकूटदादांची आहे.

बाजाराला विक्रेत्यांना त्रास होऊ नये म्हणून अर्जुन आवटे, दादा खांडेकर आदी विक्रेत्यांनी पुढाकार घेऊन काही वर्षांपूर्वी राजवंश आठवडा बाजार संघटनेची स्थापना केली आहे. तीन दिवसांपूर्वी झालेल्या सोमवारच्या आठवडा बाजारात एक फळकूटदादा विक्रेत्यांना त्रास देत असतानाच त्यांनी विरोध केला व त्याला बाजारातुन हाकलून लावत त्याची कोरेगाव नगर पंचायत व पोलीस ठाण्यात तक्रार केल्यानंतरही कुणी दखल घेतली नाही. त्यामुळे या फळकूटदादांचा कोण बंदोबस्त करणार? हा प्रश्न आठवडा बाजार संघटना व विक्रेत्यांना पडला आहे.

## मारहाणीसह जबरी चोरी प्रकरणी चौघांवर गुन्हा

**सातारा : प्रतिनिधी**

मारहाणीसह जबरी चोरी केल्याप्रकरणी चौघांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ६ फेब्रुवारी रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास तहसीलदार कार्यालय सातारा येथे गोविंद श्रीरंग गायकवाड रा. गोडोली, ता. सातारा हे जमिनीचे नकाशे अर्ज जमा करण्यासाठी सातारा येथील तहसीलदार कार्यालयात गेले असता चंद्रकांत मुगुट गायकवाड, सचिन मुकुट गायकवाड, विजय गणपत गायकवाड आणि इतर एक जण अशा चौघांनी गोविंद गायकवाड यांना काठीने आणि उसाने मारहाण करीत त्यांच्या गळ्यातील अडीच तोळ्याची चेन खेचून नेऊन तसेच त्यांच्या मोटरसायकलचे नुकसान केले आहे. याप्रकरणी संबंधितांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार मेचकर करीत आहेत.

## ल्हासुर्णेजवळ उसाच्या ट्रॅक्टरखाली सापडून ३ वर्षांचा मुलगा ठार

**कोरेगाव : प्रतिनिधी**

सातारा - कोरेगाव रस्त्याकडेला ल्हासुर्णे (ता. कोरेगाव) गावाच्या हद्दीतील घोल नावाच्या शिवारात आज दुपारी उसाच्या फडात ऊसाच्या ट्रॅक्टरखाली सापडून तीन वर्षाचा मुलगा ठार झाला आहे.

पोलिसांनी सांगितले की, ल्हासुर्णे गावच्या हद्दीत लक्ष्मण दशरथ संकपाळ यांच्या शेतातील तोडलेला ऊस सागर शिवाजी राठोड (रा. अल्हनवाडी, ता. पाथर्डी, जि. नगर) हा ट्रॅक्टरमध्ये (क्रमांक : एम. एच. २३- बी. सी. ५६२३) भरून रस्त्याकडे निघाला होता. त्यावेळी ट्रॅक्टरच्या डाव्या चाकाखाली अचानक संकेत कृष्णा जाधव (वय तीन) हा मुलगा आल्याने तो चाकाखाली सापडल्याने गंभीर जखमी झाला. त्याच्या तोंडातून रक्ताच्या उलट्या येऊ लागले. त्यामुळे त्याला तातडीने तेथील लोकांनी एका ऊतोडणी मजुराच्या मोटार सायकलवरून कोरेगाव येथे उपजिल्हा रुग्णालयात उपचारार्थ नेले. तेथे डॉक्टरांनी तपासणी करून तो लहान मुलगा मृत्युमुखी पडल्याचे जाहीर केले.

दरम्यान, याबाबतची फिर्याद मृत संकेतचे वडील कृष्णा बबन जाधव (वय २३, रा. बोदेगाव, ता. शेवगाव, जि. नगर) यांनी येथील पोलिसात दाखल केली असून, त्यानुसार पोलिसांनी ट्रॅक्टर चालक श्री. राठोड याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.

## महिलेच्या विनयभंगासह मारहाण केल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा

**सातारा : प्रतिनिधी**

महिलेच्या विनयभंगासह मारहाण केल्याप्रकरणी चौघांवर पुसेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक सात फेब्रुवारी रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास काळेवाडी पोस्ट डिस्कळ तालुका खटाव गावच्या हद्दीत शारदा दत्तात्रय काळे यांच्या घरात जमिनी संदर्भात बैठक सुरू असताना या बैठकीचे वादात रूपांतर होऊन या वादात तेथीलच विशाल अर्जुन वाघ, अर्जुन बाबुराव वाघ, विद्या अर्जुन वाघ, मोनिका विशाल वाघ यांनी शारदा काळे यांना मारहाण करीत त्यांचा विनयभंग केल्याची तक्रार पुसेगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

अधिक तपास सहाय्यक फौजदार सी. आर. खाडे करीत आहेत.

# बिबट्याची पिल्ले व मादी मातेची भेट घडवीण्यात वनविभागाला यश

**पाचगणी : प्रतिनिधी**

पाडळी येथे बुधवारी ऊसाची तोडणी करताना अचानक कामगारांच्या निर्दशनास बिबट्याची दोन पिल्ले आल्याने कामगारांमध्ये घबराट निर्माण झाली. या पिल्लांची माहीती शेतमालकाने वन विभागाला देताच वनविभागाने घटनास्थळी धाव घेऊन पिल्लांना ताब्यात घेत सायंकाळी बछड्यांची मादी सोबत भेट घालण्यात वन विभागाला यश आले.

मौजे पाडळी, ता. जि. सातारा येथील गोरखनाथ विष्णू ढाणे यांच्या शेतात दुपारी १.०० वाजण्याच्या सुमारास ऊसतोड कामगारांना ऊसामध्ये बिबट्याची २ बछडे दिसले असल्याची माहिती शेतमालक गोरखनाथ ढाणे व अमर ढाणे (उपसरपंच)



यांनी वन विभागाला दिली. तात्काळ वनपाल परळी, वनरक्षक ठोसेघर, रेस्कु टीम, वनकर्मचारी यांनी घटनास्थळी जाऊन सदर बिबट्याच्या दोन पिल्लांना ताब्यात घेतले. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली सदर पिल्ले व बिबट्या मादी (आई) यांचे पुनर्मिलन घडवून आणण्यासाठीचे नियोजन केले. बाजूने अत्याधुनिक ट्रॅप कॅमेरे लाऊन दोन्ही पिल्ले ट्रेमध्ये ठेवले त्यानंतर सदर पिल्लांची मादी बिबट आई त्या पिल्लांजवळ येऊन सायंकाळी ०७.४३ वाजता पिल्लांना आपल्या सोबत घेऊन गेली. सदरील मिलन बावधन पुणे येथील ठएडट संस्थेच्या मदतीने केले.

सदरची कार्यवाही श्री. उत्तम सावंत उपवनसंरक्षक सातारा, श्री. महेश झांजुर्णे सहाय्यक वनसंरक्षक सातारा, श्री निवृत्ती चव्हाण वनक्षेत्रपाल सातारा यांचे मार्गदर्शनाखाली अरुण सोळंकी वनपाल परळी, अशोक मलप वनरक्षक ठोसेघर, हर्षद नागरे, शुभम सिंग (RESQ संस्था बावधन पुणे), लोकेश रिटे, ओमकार ढाले, शेखर चव्हाण, सुजित फणसे, संतोष दळवी व पाडळी ग्रामस्थ यांनी केली.

# शर्यतीदरम्यान बैलगाडीखाली सापडून युवकाचा मृत्यू; बोरखळ येथील दुर्दैवी घटना

**सातारा : प्रतिनिधी**

बोरखळ, तालुका सातारा येथे बैलगाडी शर्यतीदरम्यान एका बैलगाडीतून पडलेल्या २१ वर्षे युवकाच्या अंगावरून मागून येणाऱ्या बैलगाडीची चाक गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची खळबळ जनक घटना गुरुवारी दुपारी चारच्या दरम्यान घडली. गणेश वाडी येथील पुष्कर पवार असे त्या दुर्दैवी युवकाचे नाव आहे. या प्रकरणाची गंभीर दखल सातारा तालुका पोलीस ठाण्याने घेतली असून याप्रकरणी शर्यतीचे आयोजन करणाऱ्या आयोजकांवर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याची माहिती आहे.

बोरखळ तालुका सातारा येथे गावांमध्ये बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी चारच्या दरम्यान शर्यतीमध्ये बैलगाडी भरदा वाचताना पुष्कर पवार हा युवक तोल जाऊन खाली पडला त्यावेळी मागून येणाऱ्या बैलगाडीचे चाक अंगावरून गेल्याने तो गंभीर जखमी झाला. त्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती आहे. या प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या दुर्दैवी घटनेची एकच हळूहळू व्यक्त होत आहे. सातारा तालुका पोलिसांनी या प्रकरणी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे मात्र रात्री उशिरापर्यंत या संदर्भात कोणताही गुन्हा दाखल झाला नव्हता. पुष्कर याला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात घालवण्यात आले असता त्याला तेथे मृत घोषित करण्यात आले. सातारा तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी संबंधित बैलगाडा स्पर्धा संयोजकांवर गुन्हा दाखल करणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

## अवैधरित्या शस्त्र बाळगल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा

**सातारा : प्रतिनिधी**

अवैधरित्या अग्नीशस्त्र जवळ बाळगल्याप्रकरणी दोघांवर औंध पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास औंध ते चौकीचा आंबा जाणाऱ्या रस्त्यावर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल धीरज महाडिक यांना विशाल संदीप भोसले वय २४ आणि अक्षय प्रमोद हजारे वय १८, दोघेही रा. जुना स्टॅन्ड, औंध, ता. खटाव यांच्याजवळ अग्निशस्त्र आणि दोन जिवंत काडतुसे आढळून आली. या दोघांकडून एक देशी बनावटीचे पिस्टल, दोन जिवंत काडतुसे, बजाज पल्सर मोटरसायकल आणि मोबाईल हँडसेट असा १ लाख २१ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

## पती-पत्नीस मारहाण केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** पती-पत्नीस मारहाण केल्याप्रकरणी एकावर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ७ फेब्रुवारी रोजी देगाव, ता. सातारा येथे सुधा मानसिंग माने राहणार देगाव, ता. सातारा यांना तसेच त्यांच्या पतीला तेथीलच सुधा माने यांचे दीर ज्ञानदेव निवृत्ती माने यांनी मारहाण केल्याप्रकरणी सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पो. ना. एस. के. पिसाळ करीत आहेत.

## युवतीचा विनयभंग केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** युवतीचा विनयभंग केल्याप्रकरणी एकावर शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ७ फेब्रुवारी रोजी सातारा शहरा नजीकच्या उपनगरात राहणारी एक युवती सातारा शहरात वडिलांबरोबर आली असता सुरज गाडे (पूर्ण नाव माहित नाही) वय अंदाजे २२, रा. माची पेठ, सातारा याने तिला मारहाण करीत तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. दरम्यान तिचे वडील मध्ये आले असता त्यांनाही गाडे याने हाताने मारहाण केली. याबाबतचा गुन्हा शाहूपुरी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक फौजदार गायकवाड करीत आहेत.

# किसन वीर महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांचे कोल्हापूरच्या कणेरी मठात स्वच्छता अभियान

## मा. मदनदादांच्या संकल्पनेतून साकारला उपक्रम

**वाई : प्रतिनिधी**

कणेरी जि. कोल्हापूर येथे दि. २० ते २६ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत लोकमंगल पंचमहाभूत लोकोत्सव राबविला जाणार आहे. माणसाच्या निसर्गावरील हल्ल्यामुळे सृष्टीचा ऱ्हास होत आहे. तो रोखण्यासाठी समाजात जागृती करून, पुढील पिढीला आपल्या संस्कृतीची नव्याने ओळख व्हावी व त्यातून एक निकोप वातावरण निर्माण होऊन नव्या पिढीला प्रदूषणमुक्त सृष्टी मिळावी यासाठी मठाधिपती प.पु. काडसिद्धेश्वर महाराज यांच्या कल्पनेतून या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.



सदर समजोपयोगी उपक्रमामध्ये महाविद्यालयाच्या एन.एस.एस च्या स्वयंसेवकांनी सहभागी व्हावे व या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर कणेरी येथे जाऊन स्वच्छता अभियान राबवावे असा मनोदय जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. मदनदादा भोसले यांनी व्यक्त केला, त्यानुसार महाविद्यालयातील एन.एस.एस. चे ५० स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी डॉ. अंबादास सकट, डॉ. संग्राम थोरात, सदस्या प्रा. सौ. नीलम भोसले, प्रा. स्नेहल पिसाळ यांनी या उपक्रमात सहभागी होऊन कणेरी परिसरामध्ये नर्सरी मधील स्वच्छता, वृक्षारोपण, सभामंडपाच्या उभारणीत हातभार लावला.

सिद्धगिरी वाहिनीस मुलाखत देताना, कार्यक्रम अधिकारी डॉ. अंबादास सकट, डॉ. संग्राम थोरात व संतोषी काळे, सुयश पाटणे, संचिता मोरे, निखिल कांबळे, कीर्ती पिसाळ, ऐश्वर्या शेलार या स्वयंसेवकांनी मा. मदनदादा यांचे आभार मानले व उपक्रमातील सहभागाबद्दल समाधान व्यक्त केले.

या उपक्रमासाठी जनता शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. जयवंत चौधरी, प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे एन.एस.एस. चे सल्लागार डॉ. सुनील सावंत, डॉ. चंद्रकांत कांबळे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

# जागरूक पालक, सुदृढ बालक अभियान

## ० ते १८ वयोगटातील सर्वांची आरोग्य तपासणी

**सातारा : प्रतिनिधी**

जागरुक पालक, सुदृढ बालक अभियान अंतर्गत जिल्ह्यातील ० ते १८ वयोगटातील बालके तसेच किशोरवयीन मुला-मुलींची सर्वांगिण आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील अंदाजे ६ लाख ४८ हजार बालके व किशोरवयिन मुले-मुली यांच्या आरोग्याची तपासणी करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी यांच्या मार्गदर्शनाखाली आठ आठवडे चालणाऱ्या या अभियानाची सुरुवात गुरुवार दि. ९ फेब्रुवारी २०२३ रोजी पासून होणार आहे.



या अभियानाच्या नियोजनाविषयी निवासी उपजिल्हाधिकारी प्रशांत आवटे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक संपन्न झाली. या बैठकीस शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चव्हाण, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण) रोहिणी ढवळे, जिल्हा आरोग्य अधिकरी डॉ. वैशाली बडदे आदी उपस्थित होते.

या अभियानांतर्गत शासकीय व निमशासकीय शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, खाजगी शाळा, आश्रम शाळा, अंध शाळा, दिव्यांग शाळा, अंगणवाड्या, खाजगी नर्सरी, बालवाड्या, बालगृहे, बालसुधारगृहे, अनाथ आश्रम, समाज कल्याण व आदिवासी विभाग वसतीगृहे आणि शाळा बाह्य मुले-मुली याठिकाणी आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. यासाठी प्राथमिक तपासणीसाठी ४४१ पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

प्राथमिक तपासणीमध्ये उपचारांची आवश्यकता असल्यास अशा बालकांना औषधोपचार देऊन उपजिल्हा रुग्णालय तसेच जिल्हा रुग्णालयामध्ये पाठविण्यात येणार आहे. तसेच प्रतिबंधात्मक आरोग्य सुविधा पुरवणे आणि सुरक्षित व सदृढ आरोग्यासाठी समुपदेशनही करण्यात येणार आहे. शस्त्रक्रियेची आवश्यकता असणाऱ्या बालके व किशोरवयीन मुले-मुलींनाही विशेष तज्ञ डॉक्टर्स उपलब्ध असलेल्या रुग्णालयांमध्ये पाठविण्यात येणार आहे.

# मायणी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी प्रकाश कणसे बिनविरोध

**मायणी : प्रतिनिधी**

मायणी, ता. खटाव गावच्या तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी माजी सरपंच प्रकाश कणसे यांची सर्वांनुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

मायणी येथे आयोजित ग्रामसभेत विद्यमान उपसरपंच दादासाहेब कचरे यांनी प्रकाश कणसे यांच्या अध्यक्षपदासाठीचा ठराव मांडला व त्यास सूचक अनिल माळी यांनी तर स्वप्नील घाडगे अनुमोदन दिले. प्रकाश कणसे यांनी यापूर्वी मायणी ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून उत्कृष्ट कार्य केले होते.सदर निवडी बद्दल माजी जि. प. सदस्य व मायणी अर्बन बँकेचे चेअरमन सुरेंद्र गुदगे यांच्या हस्ते त्यांचा मानाचा फेटा, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

प्रकाश कणसे यांचे अभिनंदन करताना सुरेंद्र गुदगे म्हणाले , सरपंच पदाच्या कारकिर्दीत प्रकाश कणसे यांनी आपल्या कार्याची तप्तरता दाखवून ग्रामपंचायतीचा कारभार अत्यंत उत्कृष्टपणे केला होता. आपल्या अध्यक्षपदाच्या



**मायणी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष प्रकाश कणसे यांचा सत्कार करताना सुरेंद्र गुदगे व मान्यवर.**

कारकीर्दीत प्रकाश कणसे यांनी गावांमध्ये तंटा होणार नाही याबद्दल काळजी घेऊन काही तंटे झाल्यास ते सामोपचाराने मिटवून मायणी गाव शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा.

यावेळी सत्कारास उत्तर देताना प्रकाश कणसे म्हणाले, माझ्यावर संघटनेने दिलेली जबाबदारी मी समर्थपणे सांभाळून मायणी गाव पूर्ण तंटामुक्त करण्याचा प्रयत्न सर्वांच्या सहकार्यातून करेन. यासाठी सर्वांनी आपणास सहकार्य द्यावे.

प्रास्ताविक उपसरपंच दादासाहेब कचरे यांनी केले. यावेळी सरपंच सोनाली माने ,सर्व ग्रा. पं. सदस्य ,सोसायटीचे चेअरमन व संचालक, ग्रामविकास अधिकारी मुलाणी, विविध संस्थांचे प्रतिनिधी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# वैद्यकीय विद्यार्थ्यांनी भविष्यात सामाजिक उत्तरदायित्व जपले पाहिजे : ना. राधाकृष्ण विखे-पाटील

## कृष्णा विद्यापीठाचा दीक्षांत सोहळा संपन्न

**कराड : प्रतिनिधी**

लोकांना तंत्रज्ञान सहज उपलब्ध झाल्याने लोक जागरूक झाले आहेत. अशावेळी बदलते तंत्रज्ञान आत्मसात करत, विद्यार्थ्यांनी भविष्यात वाटचाल करताना आपले सामाजिक उत्तरदायित्व जपले पाहिजे. वैद्यकीय शिक्षणाची पदवी प्राप्त केल्यानंतर ग्रामीण भागात सेवा देणे हे विद्यार्थ्यांचे कर्तव्य असून, सामाजिक दृष्टिकोन बाळगून काम करा, असे आवाहन राज्याचे महसूलमंत्री ना. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केले. कृष्णा विश्व विद्यापीठाच्या ११ व्या दीक्षांत सोहळ्यात प्रमुख अतिथी या नात्याने ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलपती डॉ. सुरेश भोसले होते.

कृष्णा विद्यापीठाच्या प्रांगणात खास उभारलेल्या शामियानात हा दीक्षांत सोहळा रंगला. पोलिस दलाच्या विशेष बॅन्डपथकाच्या मानवंदनेत प्रमुख पाहुण्यांना समारंभस्थळी नेण्यात आले. व्यासपीठावर इजिप्शियन सिनेटच्या सदस्य व मर्क फाऊंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राशा केलेज, कुलपतींचे प्रधान सल्लागार डॉ. वेदप्रकाश मिश्रा, प्र-कुलपती डॉ. प्रवीण शिनगारे, कुलगुरू डॉ. नीलम मिश्रा, कृष्णा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. अतुल भोसले, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य श्री. विनायक भोसले, दिलीप पाटील, डॉ. दिपक टेम्पे, डॉ. सबिता राम, सौ. मनिषा मेघे, कार्यकारी संचालक पी. डी. जॉन, परीक्षा नियंत्रक डॉ. रजनी गावकर, संशोधन संचालक डॉ. प्रमोद जॉन, डॉ. डी. के. अगरवाल, कृष्णा हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक डॉ. ए. वाय. क्षीरसागर, मेडिकल ॲडमिनिस्ट्रेटर डॉ. आर. जी. नानिवडेकर, कुलसचिव डॉ. एम. व्ही. घोरपडे आदी मान्यवर उपस्थित होते.

या सोहळ्यात विद्यापीठातील ९६१ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये १३ जणांना कुलपती डॉ. सुरेश भोसले यांच्या हस्ते पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. तर प्रमुख मान्यवरांच्या हस्ते विविध अधिविभागात सर्वोत्कृष्ट ठरलेल्या विद्यार्थ्यांना विशेष पदक देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच इजिप्शियन सिनेटच्या सदस्य व मर्क फाऊंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राशा केलेज यांना, आरोग्य क्षेत्रात दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल विद्यापीठातर्फे 'डी. लिट' सन्मान प्रदान करण्यात आला.

यावेळी बोलताना ना. विखे-पाटील म्हणाले, सहकारमहर्षी स्व. जयवंतराव भोसले यांनी दूरदृष्टी ठेऊन 'कृष्णा'च्या रुपाने लावलेल्या रोपट्याचा आज डॉ. सुरेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वटवृक्ष झाला आहे. कोविड काळात कृष्णा हॉस्पिटलने मोठे काम केले असून, ते कौतुकास्पद आहे. शिक्षण क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाबरोबर काळानुरूप बदल करण्याची गरज असून, संशोधनाकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. वैद्यकीय क्षेत्र हे समाजसेवेचे, मानवतेचे आहे हे आपण सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. सुरेश भोसले म्हणाले, की कृष्णा विश्व विद्यापीठ ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून संशोधन, नवनिर्मितीला चालना देणारे ज्ञानकेंद्र आहे. विशेषत: वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनाला चालना देण्याचे कार्य करतानाच, तळागाळातील समाजापर्यंत आरोग्यसेवा पोहचविण्याचे आणि आरोग्याबाबत लोकजागृती करण्यावे काम कृष्णा विश्व विद्यापीठ करत आहे. कृष्णा हॉस्पिटलने कोविड काळात ९००० हून अधिक रुग्णांवर उपचार केले आहेत. शिरवळ येथे लवकरच विद्यापीठाचा नवीन कॅम्पस विकसित करण्यात येणार आहे.

'डी.लिट'प्राप्त डॉ. राशा केलेज म्हणाल्या, कृष्णा विश्व विद्यापीठ 'क्लास वन' विद्यापीठ असून, त्यांनी मला डी.लिट पदवी देऊन सन्मानित केल्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. आमच्या फौंडेशनच्या माध्यमातून आत्तापर्यंत ५० देशांतील शेकडो विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप देण्यात आली असून, या कामात मला माझ्या कुटुंबीयांसह समाजाचेही मोठे सहकार्य लाभले आहे.

सोहळ्याला जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी, पोलिस अधीक्षक समीर शेख, कृष्णा महिला औद्योगिक संस्थेच्या संस्थापिका सौ. उत्तरा भोसले, सौ. गौरवी भोसले, माजी आमदार आनंदराव पाटील, कराडच्या नगराध्यक्षा सौ. रोहिणी शिंदे, कृष्णा वैद्यकीय विज्ञान विभागप्रमुख डॉ. एस. टी. मोहिते, दंतविज्ञान विभागप्रमुख डॉ. शशिकिरण एन. डी., फिजिओथेरपीचे विभागप्रमुख डॉ. जी. वरदराजूलु, नर्सिंग विज्ञानच्या विभागप्रमुख डॉ. वैशाली मोहिते, अलाईड सायन्सचे विभागप्रमुख डॉ. गिरीश पठाडे, फार्मसीचे विभागप्रमुख डॉ. आर. सी. डोईजड, अधिष्ठाता डॉ. सौ. सुप्रिया पाटील, डॉ. सौ. रेणुका पवार, डॉ. टी. पूविष्णू देवी, डॉ. ज्योती साळुंखे, डॉ. स्नेहल मसूरकर, डॉ. अक्षदा कोपर्डे, डॉ. स्वप्ना शेडगे, डॉ. एस. आर. पाटील यांच्यासह विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे सदस्य व विविध क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी, पालक, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




कराड : कृष्णा विश्व विद्यापीठाच्या ११ व्या दिक्षांत सोहळ्यात इजिप्शियन सिनेटच्या सदस्य डॉ. राशा केलेज यांना 'डी. लिट' प्रदान करताना कुलपती डॉ. सुरेश भोसले. बाजूस डॉ. प्रवीण शिनगारे, डॉ. नीलम मिश्रा, विनायक भोसले व अन्य मान्यवर.




कराड : कृष्णा विश्व विद्यापीठाच्या ११ व्या दिक्षांत सोहळ्यात बोलताना महसूलमंत्री ना. राधाकृष्णा विखे-पाटील. बाजूस कुलपती डॉ. सुरेश भोसले, डॉ. राशा केलेज, डॉ. वेदप्रकाश मिश्रा, डॉ. प्रवीण शिनगारे, डॉ. नीलम मिश्रा, डॉ. अतुल भोसले, विनायक भोसले व अन्य मान्यवर.

### ईशा ठरली ५ पदकांची मानकरी

**एमबीबीएस अधिविभागातील कु. ईशा या विद्यार्थीनीने सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांसाठी प्रदान करण्यात येणारे स्व. गोविंद विनायक अयाचित स्मृती सुवर्णपदक, स्व. डॉ. एम. एस. कंटक ॲवार्ड, यू.एस.व्ही. पदक, डॉ. आर. एस. कोप स्मृती पुरस्कार, डॉ. व्ही. के. किर्लोस्कर पुरस्कार अशी एकूण ५ पदके पटकाविली. विद्यापीठातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांसाठी प्रदान करण्यात येणारे स्व. जयवंतराव भोसले सुवर्णपदक मुस्कान दिपक आहुजा हिने; तसेच बीडीएस अभ्यासक्रमाच्या सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांना देण्यात येणारे स्व. जयमाला भोसले सुवर्णपदक अनेरी अशोक वाईकर या विद्यार्थीनीने पटकाविले. तसेच अक्षता फडतरे, कु. अथिरा, धृती रंगेन, प्रतीक श्रीवास्तव, अमित खंडागळे, छवी शृंगारपुरे, जोशुआ फोन्सेका, विल्सन घाटगे, डॉ. अवंती दामले, डॉ. ऋतुजा जाधव, डॉ. राधा बावगे यांनीही विविध पारितोषिके पटकाविली.**

### 'कृष्णा' व 'प्रवरा'चा वारसा कायम

**कृष्णा आणि प्रवरा शिक्षण संस्थेची स्थापना एकाचवेळी झाली. आमच्या वडिलांनी आणि आप्पासाहेबांनी केलेल्या या सामाजिक कार्याचा व ज्ञानदानाचा हा वारसा आम्ही अविरतपणे जोपासत आहोत. डॉ. अतुल भोसले हे उद्याचे भविष्य असून, त्यांची जबाबदारी आम्ही घेत आहोत, असे प्रतिपादन ना. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी यावेळी केले.**

# आग्रा किल्ल्यावर शिवजयंती होणार : महाराष्ट्र सरकार सहआयोजक होण्यास तयार

## शिवप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण

**मुंबई : प्रतिनिधी**

आग्रा किल्ल्यावर शिवजयंती उत्साहात साजरी होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने राज्य सरकार सहआयोजक असेल, तर परवानगी देऊ असे म्हटल्यानंतर आता राज्य सरकार सहआयोजक होण्यास तयार झाले आहे.

पुरातत्त्व खात्याने आग्रा किल्ल्यात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्याची परवानगी नाकारली होती. त्यामुळे हा विषय दिल्ली हायकोर्टात पोहोचला होता. बुधवारी न्यायालयाने राज्य सरकार सहआयोजक असेल तर आग्रा किल्ल्यातील शिवजयंतीला परवानगी मिळेल, असा निर्णय दिला. त्यामुळे आग्रा किल्ल्यातील शिवजयंती उत्सवाच्या आशा पल्लवित झाल्या. शिवप्रेमीमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.



दिल्ली हायकोर्टाने म्हटले आहे की, राज्य सरकारने पुरातत्व खात्याला पत्र पाठवून आपण सहआयोजक असल्याचे सांगायला हवे, असे केल्यानंतरही जर पुरातत्व विभागाने परवानगी नाकारली तर याचिकाकर्ते पुन्हा कोर्टात येऊ शकतात, असेही दिल्ली हायकोर्टाने स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र राज्य सरकारने आग्रा येथील शिवजयंती कार्यक्रमाचे सहआयोजक व्हावे आणि तसे पत्र तातडीने केंद्र सरकारला द्यावे, अशी आमची राज्य सरकारला विनंती असल्याचे आयोजक विनोद पाटील यांनी म्हटले होते.

आग्रा येथे शिवजयंतीचे आयोजन करण्यास पुरातत्व विभागाने परवानगी द्यावी, असे पत्र यापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुरातत्व विभागाला लिहिले आहे. त्याचीही नोंद न्यायालयाने घेतली आहे. आता सहआयोजक असल्याचे पत्र तातडीने राज्य सरकारने केंद्र सरकारला दिल्यास आग्रा येथील शिवजयंतीचा मार्ग मोकळा होणार आहे. मुख्यमंत्री असे पत्र केंद्राला लिहितील असा मला विश्वास वाटतो.

**परिपत्रक ठरले अडचणीचे**

पुरातत्व विभागाने २००४ साली काढलेल्या परिपत्रकानुसार कोणत्याही खासगी कार्यक्रमाला परवानगी देता येत नाही. तसेच परवानगी देण्याचा अधिकार हा महासंचालकांना आहे, असेही पुरातत्व विभागातर्फे कोर्टात सांगण्यात आले आहे. आर. आर. पाटील फाऊंडेशन आणि अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठान हे खूप चांगले काम करत असून त्यांना प्रोत्साहन द्यायला हवे असेही मत कोर्टाने नोंदवले आहे. २००४ च्या परिपत्रकाला आव्हान देण्यासाठी खूप वेळ जाईल. त्यामुळे येत्या १९ तारखेला शिवजयंती साजरी करायची असल्यास महाराष्ट्र सरकारला सहआयोजक करा आणि शिवजयंती साजरी करा असेही कोर्टाने म्हटले आहे.

# भूकंपग्रस्त तुर्कीत भारताचे ऑपरेशन दोस्त : संकटकाळात मदतीसाठी तुर्की महिलेने भारतीय जवानाचे मानले आभार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

तुर्कस्तानमध्ये बचाव आणि मदत कार्यासाठी कार्यरत असलेल्या भारतीय लष्कराच्या महिला सैनिकाच्या चेहऱ्याचे चुंबन घेत असलेल्या तुर्की महिलेचे छायाचित्र ऑनलाइन व्हायरल होत आहे. भारतीय लष्कराच्या अतिरिक्त महासंचालनालयाच्या अधिकृत ट्विटर हँडलवरून ही पोस्ट शेअर करण्यात आली आहे. त्यांनी कॅप्शनमध्ये लिहिले की, ''वी केअर.''

लष्कराच्या या प्रयत्नांचे अनेकांनी कौतुक केले आहे. एका युझरने म्हटले की, ''ते युद्धासाठी नाहीत. पण स्वतःच्या देशातील लोकांचे आणि इतर गरजू देशांचे रक्षण करण्यासाठी. टीमला खूप खूप शुभेच्छा. Operation Dost. ''मानवता हा जगातील सर्वात मोठा धर्म आणि सत्य आहे आणि भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे,'' असे आणखी एका युझरने म्हटले आहे.



'ऑपरेशन दोस्त'चा एक भाग म्हणून भारतीय लष्कराने वैद्यकीय साहित्य, एक फिरते रुग्णालय, वैद्यकीय व्यवसाय आणि शोध आणि बचाव पथके ढिगाऱ्यातून खणून वाचवण्यासाठी पाठवली आहेत. भारतीय सैन्याने रुग्णालय बांधताना आणि त्यानंतर भूकंपग्रस्त भागातील रहिवाशांवर उपचार करतानाची छायाचित्रे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी ट्विटरवर शेअर केली आहेत.

# पाकिस्तानी तस्करांनी पुन्हा ड्रोन पाठवले : फिरोजपूरमध्ये बीएसएफने गोळीबार केला

## २१ कोटींचे हेरॉईन आणि पिस्तूल जप्त



**लुधियाना : वृत्तसंस्था**

पाकिस्तानकडून दिवसेंदिवस भारतावर करण्यात येणाऱ्या कुरघोड्या वाढतानाच दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांपासून भारत-पाकिस्तान सीमेवर ड्रोनची घुसखोरी थांबण्याचे नाव काही घेण्यात येत नाही. पाकिस्तानी तस्करांनी पुन्हा एकदा पंजाबच्या सीमेवर आपल्या नापाक कारवाया करण्याचा प्रयत्न केला आहे. शुक्रवारी सकाळी सीमा सुरक्षा दलाला (बीएसएफ) फिरोजपूर सेक्टरमध्ये ड्रोनची हालचाल आढळून आली. झडतीदरम्यान जवानांकडून २१ कोटी रुपयांचे हेरॉईन आणि शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.

बीएसएफकडून मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवार-शुक्रवारी रात्री जवान फिरोजपूर सेक्टरमधील बीओपी (बॉर्डर आउट पोस्ट) चथ उत्तर येथे गस्तीवर होते. इतक्यात त्यांना ड्रोन येण्याचा आवाज आला. यावर जवानांनी गोळीबार सुरू केला. दरम्यान ड्रोनने काहीतरी फेकल्याचे जाणवले. काही वेळाने ड्रोन पुन्हा पाकिस्तानी हद्दीत गेला. त्यानंतर बीएसएफच्या जवानांनी परिसरात शोधमोहीम सुरू केली.

**झडतीत हेरॉईन आणि पिस्तूल सापडले**

बीएसएफने बीओपी नॉर्थजवळ झडतीदरम्यान एक पिवळे पॅकेट जप्त केले. यासोबतच बीएसएफने चायना मेड पिस्तूलही जप्त केले आहे. सुरक्षा तपासणीनंतर पॅकेट उघडले असता त्यात तीन किलो हेरॉईन आढळून आले. हे ताब्यात घेऊन बीएसएफने तपास सुरू केला आहे.

**पंजाब सीमेवर पाकिस्तानमधून पुन्हा आले ड्रोन**

गुरुदासपूर सेक्टरमध्ये ड्रोनची हालचाल दिसून आली. सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी गोळीबार करून ड्रोनला परत जाण्यास भाग पाडले. त्यानंतर परिसरात सर्च ऑपरेशनही करण्यात आले. येथे वाचा संपुर्ण बातमी.


ड्रोनचा वापर आता निगराणीसाठी तसेच सर्जिकल स्ट्राईकसाठी केला जाऊ शकतो. इंडिया ड्रोन फेस्टिव्हल-२०२२ मध्ये ड्रोन शक्तीच्या माध्यमातून नजीकच्या भविष्यात होणाऱ्या क्रांतिकारी बदलांची झलक पाहायला मिळाली. त्याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी दिल्लीत झाले.

# सूर्याचा मोठा भाग तुटला : जेम्स वेब स्पेस टेलिस्कोपमध्ये कैद झाली घटना, संशोधक चिंतेत

**न्यूयार्क : वृत्तसंस्था**

सुर्याबद्दल एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. सूर्याचा एक मोठा भाग त्याच्या पृष्ठभागापासून तुटला आणि वावटळीसारखा सुर्योभोवती फिरत असल्याचे समोर आले आहे. यामुळे शास्त्रज्ञ आश्चर्यचकित झाले असून ते कसे घडले हे जाणून घेण्याचा प्रयत्न शास्त्रज्ञ करत आहेत. या घटनेची नोंद नासाच्या जेम्स वेब टेलिस्कोपने केली. हा व्हिडीओ अंतराळ हवामान अंदाज शास्त्रज्ञ डॉ. तमिता स्कोव्ह यांनी गेल्या आठवड्यात ट्विटरवर शेअर केला होता.

सूर्यातून सोलर फ्लेयर्स बाहेर पडत राहतात. याचा पृथ्वीवरील कम्युनिकेशनवर परिणाम होतो. त्यामुळे संशोधक चिंतेत असून याचा पृथ्वीवर काय परिणाम होईल, हे शास्त्रज्ञ समजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत.



डॉ. स्कोव्ह यांनी ट्विटमध्ये लिहिले की, उत्तर ध्रुवाजवळील एक भाग मुख्य तंतूपासून तुटला आणि आता सूर्याभोवती फिरत आहे. येथे ५५ अंशांपेक्षा जास्त असलेल्या सूर्याच्या ऐट्मोस्फेरिक डाइनॅमिक्स समजून घेण्यासाठी फारसे काही सांगता येणार नाही. तुटलेला तुकडा सूर्याभोवती फिरत आहे.

यूएस नॅशनल सेंटर फॉर ॲटमॉस्फेरिक रिसर्चचे सौर भौतिकशास्त्रज्ञ स्कॉट मॅकिंटॉश यांनी Space.com ला सांगितले की, सोलर फ्लेयर तुटल्यानंतर असा भोवरा कधीही पाहिला नाही. मॅकिंटॉश हे अनेक दशकांपासून सूर्यावर संशोधन करत आहे.

**शास्त्रज्ञ माहिती गोळा करण्याच्या प्रयत्नात**

नासाच्या म्हणण्यानुसार, यापूर्वी अशा अनेक घटना घडल्या आहेत. मात्र या नव्या घटनेने चिंता वाढवली आहे. अंतराळ शास्त्रज्ञ आता या अनोख्या घटनेबद्दल अधिक माहिती गोळा करण्यात गुंतले आहेत. त्यामुळे २४ तास सूर्यदर्शन केले जात आहे. SpaceWeather.com मधील एका अहवालानुसार, मंगळवारी मध्यम आकाराच्या सोलर फ्लेयरमुळे प्रशांत महासागरात शॉर्टवेव्ह रेडिओ ब्लॅकआउट झाला.

**२०२८ पर्यंत पहिला 'स्पेस बेबी' जन्माला येईल**

१९६१ मध्ये मानव पहिल्यांदा अंतराळात गेला. तेव्हापासून प्रत्येकाच्या मनात प्रश्न आहे की अंतराळात मूल जन्माला घालता येईल का? जगभरातील शास्त्रज्ञ ६२ वर्षांनंतरही हे गूढ उकलू शकलेले नाहीत. तथापि, ब्रिटन आणि नेदरलँडचे शास्त्रज्ञ लवकरच या प्रश्नाचे उत्तर देऊ शकतील. iNews च्या रिपोर्टनुसार, ब्रिटीश वैज्ञानिक डच कंपनी स्पेसबॉर्न युनायटेडच्या सहकार्याने असिस्टेड रिप्रोडक्शन टेक्नॉलॉजी इन स्पेस मॉड्यूल बनवत आहेत. या अंतर्गत अंतराळात जैव उपग्रह पाठवण्यात येणार आहे. याच्या आत, इन-व्हिट्रो फर्टिलायझेशन उपचाराद्वारे गर्भाचा जन्म होईल. ते पृथ्वीवर आणून स्त्रीच्या गर्भात ट्रान्सफर केले जाईल. पृथ्वीवर जन्माला आलेल्या या मुलांना 'स्पेस बेबीज' म्हटले जाईल.

# जोशीमठमध्ये आतापर्यंत ८६८ इमारतींना तडे : २४३ कुटुंबांना शिबिरात पाठवले

**जोशीमठ : वृत्तसंस्था**

उत्तराखंडच्या जोशीमठमध्ये जमीन खचल्याने आतापर्यंत ८६८ इमारतींना तडे गेले आहेत. चमोलीचे डीएम हिमांशू खुराना यांनी शुक्रवारी याबाबत माहिती दिली. यातील १८१ इमारती असुरक्षित भागात असल्याचे त्यांनी सांगितले. हॉटेल माउंट व्ह्यू आणि मलारी इन पाडण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

हिमांशू खुराना म्हणाले की, २४३ आपत्तीग्रस्त कुटुंबातील ८७८ सदस्य मदत शिबिरात आहेत. त्यांच्या खाण्यापिण्याची, औषधांची सोय केली जात आहे. या कुटुंबांना ५१५.८० लाखांची मदत देण्यात आली आहे. हे पैसे मदत, पुनर्वसन आणि मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी देण्यात आले आहेत.

यापूर्वी २८ जानेवारी रोजी राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने तडे गेलेल्या इमारतींची संख्या ८६३ ऐवढी सांगितली होती.

जोशीमठ धसण्यापासून कुणीही थांबवू शकत नाही.

हा किस्सा उत्तराखंडमधील गढवालच्या उंच पर्वतांमधील आहे. तारीख होती २४ डिसेंबर २००९; मोठ्या शहरांमध्ये जमीनीखालून मेट्रो ट्रेनसाठी शांतपणे बोगदे खोदणारी एक प्रचंड टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) अचानक अडकली. समोरून हजारो लिटर स्वच्छ पाणी वाहू लागले. महिने लोटले, पण अतिशय कुशल अभियंतेही हे पाणी थांबवू शकले नाहीत आणि टीबीएमही सुरू झाले नाहीत.

वास्तविक या मानवनिर्मित यंत्राने निसर्गनिर्मित एका मोठ्या जलसाठ्यात छिद्र पाडले होते. दररोज ६ ते ७ कोटी लिटर पाणी सतत वाहत राहते. हळूहळू हा जलसाठा रिकामा होत गेला. हा जलसाठा जोशीमठच्या वर जवळून वाहणाऱ्या अलकनंदा नदीच्या डाव्या तीरावरील डोंगराच्या आत ३ किमी अंतरावर होता.